NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# मराठी प्रवास वर्णनाचे विविध आयाम

**डॉ. प्रशांत सूर्यवंशी** (मराठी विभागप्रमुख), पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय नागपूर.

---

**पार्श्वभूमी** –

प्रवासवर्णन हे प्रवासवृत्ताच्या कक्षा सोडून ललित रूपाच्या कक्षेत केव्हा प्रवेश घेते याचा विचार करू लागल्यावर बरेच काही स्पष्टपणे जाणवते. प्रवासवर्णन हा प्रकार कादंबरी, कथा या वाड्मयप्रकारा सारखा नसून त्याची जवळीक निबंध वाङ्मयप्रकाराशी होऊ शकते. प्रवास करतांना प्रवासातील अनुभव प्रथम येतात व नंतर कल्पनेने पुन्हा सगळा प्रवास अनुभवावा लागतो. प्रवासाच्या अनुभवांचा पुनर्शोध व शब्दांचे लालित्य यांची सांगड घालून वेधक व रंजक कलाकृतीची निर्मिती केली जाते. यामध्ये व्यक्तिमत्वाला अपरिहार्य महत्त्व असते. प्रत्यक्ष प्रवासाचा काळ, प्रवासाचे केलेलं वर्णन आणि लेखनाचा काळ त्यांच्या दरम्यान कित्येकदा दीर्घकालावधी लोटलेला असतो, अशावेळी जी प्रक्रिया वेगवेगळ्या पातळीवरची असते त्यात स्थल, काल, प्रसंग यांचा अनुभव दीर्घकाळ मनात रेंगाळत असतो आणि हे सर्व अनुभव स्मृति रूपाने त्यात पाळला जातो, इतकेच नव्हे तर प्रवासी व त्यांच्यातले गुरूत्व पाळले जातात. स्थळाचे वर्णन करायच्या हेतूने मनात लहरी निर्माण करणे ही ललित लेखनातील प्रक्रिया घडवून स्थळांना वाङ्मयीन घाट लागू शकतो.

प्राचीन मराठी वाङ्मयपेक्षा अर्वाचीन मराठी वाङ्मयात प्रवासवर्णनांची भरगोस निर्मिती झालेली आढळते. प्रवासवर्णन हा वाड्मय प्रकार इंग्रजी साहित्यात समृद्ध आहे. मराठी वाङ्मयामध्ये पहिल्या प्रवासवर्णन निर्मिती करण्याचा मान जातो तो गोडसे भटजी यांच्या माझा प्रवास कारण त्या आधीच्या प्रवासवर्णानपेक्षा माझा प्रवास वर्णनाला वाड्मय श्रेष्ठतेची जोड दिलेली सहज लक्षात येते. काकासाहेब कालेलकर, अनंत कानेकर, प्रा. वा. ल कुलकर्णी, रा. भी. जोशी, प्रा. गंगाधर गाडगिळ, डॉ. स. ग मालशे, पु ल देशपांडे, डॉ. सुधीर रसाळ, प्रभाकर पाध्ये, वीणा प्रभू, अण्णाभाऊ साठे, यशवंत मनोहर यासारख्या कलावंतांनी निर्माण केलेलं प्रवासवर्णन व प्रवासवर्णनाला लिहिलेल्या प्रास्तावनेच्या अनुषंगाने व ग्रंथ परीक्षणाच्या निमित्ताने प्रवास वर्णन या लेखनाच्या वाड्मयीन बाजूवरच विशेष भर दिला आहे

**प्रवासवर्णन : संज्ञा, संकल्पना आणि इतिहास**

प्रवासवर्णन संज्ञा

प्रवासवर्णन जीवनात प्रत्यक्ष घडलेल्या घटना प्रसंगावरच लिहिले जाते. कल्पना करून अगर इतरांच्या सांगण्यावरून वाचन करून प्रवासवर्णन केले जात नाही. जर असे लिहिले तर ते प्रवासवर्णन होऊ शकत नाही तसे लेखन करण्याचा खरंतर कोणी प्रयत्न करीत नाही.

प्रवासवर्णन = प्रवास वर्णन ( या दोन शब्दांचा मिळून झालेला नपुसकलिंगी जोडशब्द आहे.)

प्रवास = प्र वस् (हा शब्द पुल्लिंगी सामान्यनाम असून तो अधिक वस अशा मूळ संस्कृत धातूवरून साधीत झालेला आहे.)

प्र = दूर य वस् = राहणे

प्रवासी = प्रवास करणारा,मुशाफर, पांथस्थ

उतारू (पुलिंगी सामान्यनाम, प्रवास या शब्दावरून प्रवासी)

१) स्वदेश सोडून अन्यत्र जाणे देशाटन,परदेशसंचार.

२) परदेशात केलेला तात्पुरता वास, परदेशात करताना राहणे.

३) परदेश

महाराष्ट्र शब्दकोश. य. रा. दाते (१९३६) पृ.२१३३)

**प्रवासवर्णन संकल्पना :**

प्रवासवर्णन संकल्पना ही एक साहित्यिक संकल्पना आहे. ज्यामध्ये प्रवासाचे वर्णन केले जाते. यामध्ये प्रवासाच्या अनुभवांचे, संस्कृतीचे, इतिहासाचे आणि सामाजिक परिस्थितीचे वर्णन असते. खालील काही अभ्यासकांनी या संकल्पनेचा उहापोह केलेला आहे.

देश म्हणजे ती विशिष्ट भूमी, ती झाडे, ती पुष्पं, ते वातावरण आणि ती झाडे आपला जीवनरस ज्या जमिनीतून शोषून घेतात तसेच आम्ही माणसे देश या शब्दातून आमचा जिवंत शोषून घेतो व आम्ही जे आहोत ते आम्ही होतो. - अनंत काणेकर

प्रत्यक्ष घडलेल्या अगर अस्तित्वात असलेल्या गोष्टींच्याद्वारे ते लिहिले असते. -गंगाधर गाडगीळ

प्रवास वर्णन हे मुख्यतः एका व्यक्तीने प्रवासात पाहिलेल्या किंवा अनुभवलेल्या गोष्टीचे वर्णन असते. -गंगाधर गाडगीळ

मी पूर्वीची वारी केली ती जीवनाच्या वाटा निरनिराळ्या नादात चालणाऱ्या देशोदेशीच्या अनोळखी वारकऱ्यांना भेटावे म्हणून. -पु. ल. देशपांडे

स्थळाचे व्यक्तिमत्व अनेक घटकातून व्यक्त होत असते. निसर्गाने त्या स्थळांची केलेली रचना, त्याचा खडबडीतपणा, रुक्षपणा, भव्यपणा, कोतपणा, रेखीवता, रमनीयता इत्यादी त्याला व्यक्तिमत्व प्राप्त करून देत असतात. ते स्थळ आपली काही वैशिष्ट्यं घेऊन जिवंत होऊन राहते व त्यातून प्रवासवर्णनाला जिवंतपणा येतो. -रा. भी. जोशी

प्रवासवर्णन ही एक गुण प्रक्रिया आहे प्रवास प्रदेश व प्रवासी यांच्या एकजीव होण्यातून ते आकार घेत असते. -रा. भी. जोशी

प्रवासवर्णन ही अनुभवांची निर्मिती असते.- वा. ल. कुलकर्णी

प्रवासवर्णन म्हणजे संघटित झालेल्या नवप्रदेश संबंध अनुभवांची अभिव्यक्तीच असते. -डॉ. सुधीर रसाळ.

श्रीमंत, गरीब, भिकारी, साधुसंत, अध्यापक, धर्मोपदेश, व्यापारी, सरदार यांनी एकाच भूभागाचा प्रवास केला तर त्या प्रत्येकाचा त्या प्रवासातील दृष्टीकोन वेगवेगळा असतो. -र. ग. पंडित.

**मुख्य घटक**

प्रवासाचे वर्णन,अनुभवांच वर्णन,संस्कृतीचे वर्णन,इतिहासाचे वर्णन, सामाजिक परिस्थितीचे वर्णन

**संकल्पनेचे प्रकार:**

यात्रा वृत्तांत, संस्मरण, डायरी, प्रवासवर्णनात्मक कादंबरी

**संकल्पनेचे महत्त्व:**

प्रवासाच्या अनुभवांचे वर्णन करणे, संस्कृतीचे ज्ञान मिळवणे, इतिहासाचे ज्ञान मिळवणे, सामाजिक परिस्थितीचे ज्ञान मिळवणे.

**संकल्पनेची विशेषता:**

व्यक्तिगत अनुभव, वर्णनात्मक शैली, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक माहिती, लेखकाचा दृष्टीकोन

**प्रवासवर्णनाचा इतिहास :**

प्रवासाच्या इतिहासाला अनंत काळाची जोड आहेत. वारंवार भूभ्रमण करून भूगोल विद्या वाढविणारे आपले जे प्रमुख भूगोलवेत्ते पुरानात आढळतात त्यात नारद मुनी, व्यासमुनी, दत्तात्रय प्रभ, क्षत्रिय ब्राह्मणांच्या रूपातील परशुराम, पवनसूत हनुमान ही नावे सर्वानाच परिचित आहेत त्यात व्यास व परशुराम आपल्याला विशेष विभूतीमुळे चिरंजीव राहिले आहेत. (काका कालेलकर, जीवनलीला पृष्ठ २३६). भारतीय संस्कृतीचे मूल्ये, संघटना प्रचाराचे कार्य व्यासांनी भरघास प्रमाणात केल्याचे सहज लक्षात येते. इतिहासापासून ते आजतागायत प्रवासाचा इतिहास आपल्याला दिसून येतो.

प्रवास परंपरा भारतीय जीवनात प्रारंभिक काळापासून चालत येत आहे. या मागे जसे वैयक्तिक पाहणे होते तसेच भावनिक, सामाजिक, राजनैतिक सांस्कृतिक, धार्मिक कारणे होती. सुरुवातीला प्रवास क्षेत्र मर्यादित होते पण पुढच्या काळात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रवास वाहनांच्या प्राप्तीमुळे क्रमवार विकास होत जाऊन हे क्षेत्र आज प्रगत झाले आहे असे दिसून येते.

३. **प्रवासवर्णनकार : लेखन सामग्री इत्यादीचा आढावा**

आपण प्रवासवर्णनकार लेखन सामग्रीचा आढावा घेतांना, ज्यामध्ये प्रवासाची योजना, प्रवासाचे अनुभव, स्थानिक संस्कृती, आणि प्राकृतिक सौंदर्य यांचा समावेश होत असतो. प्रवासवर्णनकार लेखनासाठी हे घटक अत्यंत महत्त्वाचे असून ते प्रवासाचे विविध पैलू आणि अनुभवांचे वर्णन करतात. प्रवासवर्णनकार लेखन सामग्री साठी आणखी काही साहाय्यक सामग्री असू शकते फोटो आणि व्हिडिओ, मानचित्रे आणि नकाशे, स्थानिक इतिहास आणि संस्कृती, प्रवासाच्या टिप्स आणि सल्ले, स्थानिक संस्कृती, प्रवासाची योजना, प्राकृतिक सौंदर्य, प्रवासाचे अनुभव, प्रवासाच्या सुरक्षिततेची माहिती, प्रवासाच्या खर्चाची माहिती इत्यादी.

**प्रवासवर्णन वाङ्मय : मराठी साहित्यातील स्थान**

प्रवासवर्णन वाड्मय हे मराठी साहित्यातील एक महत्त्वपूर्ण आणि लोकप्रिय प्रकटण आहे. यामध्ये लेखक आपला प्रवास, त्या प्रवासातील अनुभव, स्थानिक संस्कृती, परंपरा, लोकजीवन, निसर्ग, ऐतिहासिक स्थळे, आणि प्रवासातील विविध घटना, निरीक्षणे, विलोभनीय निसर्गदृश्ये या सर्वाचा तपशीलवार वर्णन करतो. प्रवासवर्णन वाड्मयाने मराठी साहित्याला नवे

आयाम दिले आहेत. आणि हे वाङ्मय अनेक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण ठरले आहे. प्रवासवर्णन वाड्मय हे मराठी साहित्यात एक महत्त्वपूर्ण आणि रंगीबेरंगी प्रकार आहे. यात लेखकाने आपल्या प्रवासाच्या अनुभवांचे वर्णन केले आहे. प्रवासवर्णन वाड्मयाचा जन्म जरी यूरोपीय साहित्याच्या प्रभावामुळे झाला असला, तरी मराठीत त्याचे स्थान महत्वाचे आहे. यामध्ये लेखक आपलं साक्षात्कार, स्थलचित्रे, सांस्कृतिक संवाद, तिथल्या लोकजीवनाचा अभ्यास आणि विविध अनुभवांचे विवेचन करतो. प्रवासवर्णन वाड्मय हे साहित्य प्रकाराच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आणि रसपूर्ण प्रकार आहे.

प्रवासवर्णन लेखन हे लेखकाचे वैयक्तिक अनुभव असते. त्यामुळे त्यात त्या व्यक्तीच्या निरीक्षणांचे, विचारांचे आणि भावनांचे दर्शन घडते. प्रवासवर्णन केवळ भौतिक प्रवासाचे वर्णन करत नाही, तर त्या ठिकाणच्या संस्कृती, परंपरा, लोकजीवन, चालीरीती यांचे विस्तृत निरीक्षण करते. प्रवासवर्णन हे लेखकाचे वैयक्तिक अनुभव असतात, त्यामुळे त्यात त्याच्या निरीक्षणांचे, विचारांचे, भावनांचे वाचन करणाऱ्याशी थेट संबंध निर्माण होऊन वाड्मयाचा जन्म होतो आणि प्रवासवर्णनला लालीत्याचे रूप प्राप्त होते यामुळे प्रवासवर्णन हे आपले स्थान मराठी साहित्यात निश्चित करते.

**मराठी साहित्यात प्रवास वर्णनाचा प्रभाव:**

कालखंडात प्रवासवर्णन हा वाड्मय प्रकार बहरलेला दिसतो. प्रवासवर्णन साहित्यानं मराठी वाचन संस्कृ तीला एक नवा दृष्टिकोन दिला. समाजातील विविध तेचा अभ्यास, विविध संस्कृतीचे आदान-प्रदान आणि नवे विचार घेऊन आले. यामुळे वाचकांना विविध ठिकाणांच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कंगोऱ्यांचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. प्रवासवर्णन वाड्मयाच्या मदतीने मराठी साहित्याने नवा आकार घेतला आहे, ज्यामुळे आजही अनेक लेखक प्रवासवर्णन लिहित आहेत.

**१६३८ ते १६६५ -भरभराटीचा कालखंड :**

१६३८ ते १६६५ हा कालखंड प्रवासवर्णन वाड्मयाच्या दृष्टिकोनातून भरभराटीचा आणि महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या काळात अनेक मराठी लेखकांनी प्रवासवर्णन हे साहित्यप्रकार लोकप्रिय बनवला.

यामागील काही महत्त्वाचे कारणे आणि वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत-

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील प्रवासाच्या साधनांतील सुधारणा , प्रमुख लेखक आणि त्यांचे योगदान , सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये, परदेश प्रवासवर्णनांचा प्रारंभ, भटकंती साहित्याचा प्रारंभ, साहित्यिक शैली आणि रसाळता, प्रकाशनसंस्था आणि मासिकांचा आधार, या काळात प्रवासवर्णन वाड्मय हे स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून अधिक प्रस्थापित झाले वाचकांच्या पसंतीमुळे त्याला मोठी मागणी मिळाली.

**प्रवासवर्णन : एक ललित वाङ्मय :**

प्रकार प्रवासवर्णन हा वाङ्मय प्रकार अम्सल अनुभवांवर आधारित असून त्यात लेखक स्वतःच्या प्रवासातील ठिकाणं, लोक, संस्कृती, निसर्गसौंदर्य, ऐतिहासिक पार्शवभूमी आणि घटना यांचे वर्णन करतो. प्रवासवर्णन वाचताना वाचकाला त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन आलेल्या अनुभवाची अनुभूती मिळते. या प्रकाराच्या काही महत्त्वाच्या विशेषता पुढीलप्रमाणे आहेत. प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित वर्णन, स्थळ आणि संस्कृतीचे सजीव चित्रण, वाचकांच्या कल्पनाशक्तीला चालना, नवीन ठिकाणांची ओळख, समाजजीवनाचे प्रतिबिंब, कथात्मक शैली, साहित्यिक भाषेचा वापर, लेखकाच्या भावनिक छटा, प्रेरणादायी आणि माहितीपूर्ण, आनंददायी अनुभव.

**प्रवासवर्णन:लेखनामागील लेखकाची भूमिका :**

लेखकाची व्यापक भूमिका प्रवासवर्णनाला प्रामाणिक, सजीव आणि प्रेरणादायी बनवते. त्यामुळे प्रवासवर्णन वाचकांच्या मनात कायमचं घर करतं. प्रवासवर्णनामध्ये लेखकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते कारण तो आपल्या निरीक्षणातून, अनुभवांतून आणि विचारांतून प्रवासाचे वर्णन साकारतो.

लेखकाच्या भूमिकेचे काही महत्त्वाचे पैलू पुढीलप्रमाणे आहेत- प्रवासाचे अनुभव सांगणे, स्थानिक संस्कृतीचे वर्णन प्राकृतिक सौंदर्याचे वर्णन, प्रवासातील आव्हाने आणि अनुभव, स्थानिक लोकांचे जीवननिरीक्षकाची भूमिका, अनुभवी मार्गदर्शक , संवेदनशील कथनकर्ता , कल्पकतेचा उपयोग करणारा संशोधकाची भूमिका, वाचकाला जोडणारा दुवा इ.

**प्रवासवर्णन वाङ्मयाची वैशिष्ट्ये प्रवासवर्णन वाङ्मयाची वैशिष्ट्य:**

भौतिक आणि सांस्कृतिक चित्रण, वैयक्तिक अनुभवांचा समावेश, निसर्गाचे, स्थळांचं सजीव चित्रण, भाषेतील चित्रमयता आणि प्रवाह, सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोन, सांस्कृतिक आणि सामाजिक संवाद, रोचकता आणि आनंददायी

अनुभव, प्रत्यक्ष अनुभवाचा आधार, वर्णनशैलीची रसभरता, स्थानिक संस्कृती आणि परंपरेचं चित्रण प्रकृतीचे आणि निसर्गाचे वर्णन, प्रेरणा आणि माहितीचा स्रोत, भावनात्मक दृष्टिकोन, विविधतेचं दर्शन ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भ, नैतिक आणि तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन, शिक्षणाचे माध्यम यांचा समावेश.

**विकास आणि वाटचाल**:

प्राचीन काळ: प्रवास वर्णन मुख्यतः धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक विषयांवर आधारित असे. भटकंती आणि तीर्थयात्रांच्या संदर्भाने लिहिले गेलेले वर्णन वाचकांसाठी प्रेरणादायी ठरायचे.

मध्ययुग: साधूसंत व व्यापाऱ्यांनी लिहिलेली प्रवास वर्णने वाचकांना भिन्न देशांतील जीवनशैली, परंपरा व निसर्ग यांचा परिचय करून देत. उदाहरणार्थ, इब्न बतूता आणि हवेह्वेनसाँग यांचे प्रवास वर्णन महत्त्वाचे मानले जाते.

आधुनिक काळ: प्रिंटिंग प्रेसमुळे प्रवास वर्णनाला अधिक प्रसिद्धी मिळाली. मराठीत बालगंगाधर टिळक. र. धों. कर्वे यांसारख्या लेखकांनी प्रवास वर्णन या प्रकारात योगदान दिलं. लेखनात नवनवीन शैलींचा समावेश होऊन, प्रवास वर्णन केवळ ठिकाणांचे वर्णन न राहता व्यक्तीगत अनुभव, भावनात्मक परिवर्तन, आणि सामाजिक संदर्भ यांचा शोध घेणारी बनली.

आधुनिक माध्यमांचा प्रभाव: डिजिटल युगात ब्लॉग आणि इतर माध्यमांतून प्रवासवर्णनाला नव्या पिढीकडून अधिक प्रतिसाद मिळत आहे. यामुळे व्यक्तिशरू अनुभवांसोबतच, दृश्य-श्राव्य माध्यमातून जगभरातील ठिकाणी अधिक प्रभावीपणे सादर केली जात आहेत.

**समारोप**:

प्रवास वर्णन हा साहित्याचा एक महत्त्वाचा प्रकार असून तो लेखकाच्या प्रवासातील अनुभवाचे भावपूर्ण चित्रण सादर करतो प्रवास हा मानवाच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग असून तो केवळ ठीक ठिकाणापर्यंत पोहोचण्यापुरता मर्यादित नसतो तर तो ज्ञान अनुभव संस्कृती आणि नवनवीन विचार यांचा संगम घडवतो भारतीय वाङ्मयात प्रवासवर्णाचा उगम रामायण आणि महाभारत यासारख्या ग्रंथांमध्ये दिसतो त्या काळातील प्रवास धर्म ज्ञान तीर्थयात्रा आणि संस्कृतीचा शोध यासाठी होत असे मध्ययुगात साधुसंत व्यापारी राजदूत यांचे प्रवास वर्णन दस्तऐवजाच्या स्वरूपात उपलब्ध होते. म्हणूनच मराठी साहित्यात प्रवास वर्णनाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे हा एक वेगळा वांग्मय प्रकार म्हणून आज प्रचलित आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१) वसंत सावंत- प्रवास वर्णन एक वांङमय प्रकार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई.
२) गंगाधर गाडगीळ -साहित्याचे मानदंड पापुलर प्रकाशन मुंबई.
३) वाल कुलकर्णी -वाटचाल च्या निमित्ताने मौज प्रकाशन मुंबई.
४) अनंत काणेकर धुक्यातून लाल ताऱ्याकडे पापुलर प्रकाशन मुंबई.
५) गंगाधर गाडगीळ -सातासमुद्रापलीकडे सुविचार प्रकाशन मंडळ पुणे.